**आरोपीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा शपथेवर जबाब –**

माझे नाव – रियाज आलम शेख

माझे वय – ३७ वर्षे

व्यवसाय – गाडी खरेदी विक्री

राहाणार – अगस्ती हौसींग सोसायटी, देवी मंदिराजवळ, अलमगीरनगर, अहमदनगर.

सरतपास विधीज्ञ श्री. वाय.आर.ठोंबरे यांचे मार्फत शपथेवर सुरु –

१. मी गाडी खरेदी विक्रीचा व्यवसाय सन २०१८ पासुन करत आहे. माझे मित्र तौकिर देशमुख यांच्या मार्फत माझी आणि फिर्यादीची ओळख झाली. फिर्यादी नासीर गुलाब खान यांना जुन्या चारचाकी गाडीची आवश्यकता होती. ते माझेकडे सप्टेंबर २०२३ मध्ये आले होते. त्यांनी गाडी होंडा जॅझ ही बघीतली. ती त्यांना आवडली. ते मॉडेल २०१९ चे होते. त्याचा नंबर टी एन ३७ डीसी १०८४ असा होता. सदर गाडीचा व्यवहार रक्कम रूपये ४,५१,०००/–त झाला होता. फिर्यादीने मला इसाराचे ६०,०००/– रूपये मला दिले होते. इसार झालयानंतर मी गाडी फिर्यादीच्या ताब्यात दिली होती. ती गाडी तामीळनाडु पासींग असल्यामुळे त्यांचे नावे ट्रान्सफर करायला अडचण येत होती. फिर्यादीने सिक्युरिटी म्हणुन माझेकडुन चेक मागितला. तो कोरा सही केलेला चेक होता. मी तो चेक सिक्युरिटी म्हणुन फिर्यादीला दिला होता. ती गाडी तामीळनाडु पासींग असल्यामुळे फिर्यादीविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गाडी पोलीस ठाण्यात जमा आहे. फिर्यादी हे पत्ते खेळत असतांना त्यांची गाडी जप्त झाली. फिर्यादीने माझे चेकचा दुरोपयोग केला. मला फिर्यादीला काहीही देणे

नाही.

सरतपास पुर्ण.

फिर्यादी हे सकाळच्या सत्रात हजर होते. परंतु दुपारच्या सत्रात फिर्यादी गैरहजर. त्यांचे विधीज्ञ गैरहजर. त्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत
जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.
सही/-
(माधुरी रा.खनवे)

दिनांक २९/०१/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर